हवामान असल्यामुळे ज्या शेतक-यांकडे कर्जाची व त्यावरील व्याजाची थकबाकी आहे अशा शेतक-यांना काही सूट देण्याच्या उद्देशाने मृद संधारण कामाची थकीत कर्जे व त्यावरील व्याज माफ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि व सहकार विभाग
शासन निर्णय क्र. मृदस-१०८८-सीआर-४२६/१६९,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दि. २४ जानेवारी १९८९.

पार्श्वभूमी:-मागील ३० वर्षाहून अधिक काळात शासन जमिनीतील धूप व ओलावा टिकविण्याबाबतची कार्यवाही करत आहे. जे शेतकरी अवर्षण प्रवण क्षेत्रात आहेत किंवा ज्या शेतक-यांचा शेतसारा प्रती एकरी ५० पैशापेक्षा कमी आहे, म्हणजेच प्रती हेक्टरी १.२५ रुपयेहून कमी आहे व ज्या शेतक-यांची जमीन एकूण ४ हेक्टरपेक्षा कमी आहे अशा शेतक-यांकडील मृद संधारण कामाबाबतची जूनी थकीत कर्जे माफ करण्याचा शासनाने मार्च १९७९मध्ये निर्णय घेतला. १९८३-८४ पासून शासनाने मृद संधारणाची कामे माणलोट क्षेत्राच्या आधारे घेण्याचे व तसेच शासनाच्या निधीतून खर्च करण्याचा निर्णय घेतला. यामुळे विषेशत: विदर्भ, मराठवाडा आणि नाशिक विभागातील जे शेतकरी १९७९ मध्ये कर्ज माफीस पात्र नव्हते अशा शेतक-यांकडे फार मोठया रकमा थकीत आहेत. मृद संधारण कामे घेतांना अकूशल मजूरांना रोजगार मिळण्याची संधी मिळावी असाही एक महत्वाचा उद्देश होता.

२. या सर्व रकमा वसूल करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता यावर शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे. :-

शासन निर्णय-:-मागील काही वर्षात शेतीस प्रतिकूल हवामान असल्यामुळे वर उल्लेखलेल्या ज्या शेतक-याकडे त्यांना दिलेल्या कर्जाची थकबाकी आहे शा शेतक-यांना काही सूट देण्याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

मृद संधारण विषयक कामाची थकबाकी असलेली एकूण मुद्दल व व्याजासहीत अंदाजे ६५ कोटी रुपयांची कर्जे माफ करावीत.

३. सर्व जिल्हयांतील तहसिलदार यांना ही कर्ज[मुद्दल व व्याजासहीत] माफ करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

४. मृद संधारण कामाबाबतची माफ करण्यात आलेली कर्जे ही
"मागणी क्रमांक डी-६,
२४०२ मृद व जलसंधारण
१०२ मृद संधारण
१०२ [एक][डी] मृद संधारणाच्या उपाययोजनेद्वारे भूविकास
[ २४०२०११२]"

या शिर्षाखाली खर्ची दाखवावीत. माफ करण्यात आलेल्या रकमेपैकी मुद्दलाच्या रकमे ऐवढी रक्कम दुबेरजी रकमाद्वारे "६४०२-मृद व जल संधारण" यातीठी कर्जे" या लेखाशिर्षाखाली जमा दाखविण्यात यावी.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १३७/८९/व्यय-१, दि. २३/१/८९अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

श. शं. निश्चालराव.

जा.क्र. कृषि/मि.का/३९०/८९
जिल्हा परिषद, जळगांव
दिनांक :- १३/२/८९

प्रति,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती - [सर्व]
यांना माहितीसाठी रवाना.

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव

पंचायत समिती जामनेर
15 FEB 1989
जा. क्र. जामनेर